# भरारी

(स्वतंत्र सामाजिक कादंबरी)

ना. सी. फडके

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**भरारी : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ २३०/-

# भरारी

# १

‘‘सभ्य स्त्री, पुरुष हो, आज आपण ज्या समारंभासाठी इथे जमलो आहोत तो फार आनंदाचा आहे. जो चित्रपट सतत पन्नास आठवडे अलोट गर्दीत चालू आहे, ज्याला भारत सरकारकडून पहिल्या क्रमांकाचे सुवर्णपदक मिळालं आहे, ज्यानं चित्रपटव्यवसायात अनेक दृष्टींनी एक नवीन उच्चांक स्थापन केला आहे. त्याच्या लेखकाचा गौरव करण्यासाठी आणि लेखकाच्या तैलचित्राचं अनावरण करण्यासाठी आपण या ठिकाणी जमलो आहोत. फार आनंदाचा आहे हा समारंभ. पण आपल्या सर्वांच्या या आनंदात एक मोठा उणेपणा आहे आणि त्याचं दु:ख मनावेगळं करणं कठीण आहे. ज्या लेखकाचा गौरव आपण करणार आहोत तो आपल्यांत नाही. तो आपली जीवितयात्रा संपवून आपल्याला सोडून गेलेला असावा ही केवढी दुर्भाग्याची गोष्ट!...

अध्यक्षांच्या तोंडचे हे शब्द ऐकल्याबरोबर अगदी पहिल्याच रांगेत बसलेल्या काकासाहेबांच्या घशात आवंढा उभा राहिला, आणि डोळ्यांत अश्रू जमा झाले. ‘दुर्भाग्याची गोष्ट!’ – हे दोन शब्द त्यांच्या अंत:करणाला जाऊन भिडले. ते स्वत:शी म्हणाले, ‘खरंच, केवढी दुर्भाग्याची गोष्ट! माझा मुलगा मुकुंद आज असामान्य गुणांचा ठरला आहे. सरकारनं त्याचा बहुमान केला आहे. सारी दुनिया त्याची प्रशंसा करीत आहे. परंतु हे सारं घडत आहे त्याच्या मृत्यूनंतर! त्याच्या हयातीत त्याला यश, लौकिक, पैसा काहीच मिळालं नाही. विपरीत परिस्थितीशी आणि प्रतिकूल लोकमताशी झगडत सबंध आयुष्य त्याला काढावं लागलं. अवघ्या पस्तीस वर्षांचा

असताना त्यानं मूर्ख कृतघ्न जगाचा निरोप घेतला. जिवंत असताना, समाजाकडून त्याला काय मिळालं? तर हेटाळणी, तिरस्कार, निषेध, छळ!

त्याचा पहिला चित्रपट तर एका खळबळजनक प्रकरणाचा विषय झाला, आणि त्याची कापाकाप होऊन तो बंद पडला. मुकुंदच्या ज्या कादंबरीवर तो चित्रपट आधारलेला होता ती कादंबरी जाहीर रीतीनं जाळण्यात आली. जप्त झाली. त्याच्या काव्यसंग्रहांचीदेखील जाहीर होळी करण्यात आली. आता त्याच्या लेखनाची किंमत जगाला कळत आहे. त्याचा मोठेपणा सरकारला आणि लोकांना पटत आहे; परंतु तो होता तोपर्यंत समाजानं त्याला जवळ केलं नाही. बहिष्कृत ठरविलं!...

टाळ्यांचा कडकडाट कानी पडल्यामुळं काकासाहेब आपल्या विचारांच्या तंद्रीतून बाहेर आले. त्यांनी आजूबाजूस पाहिलं. अध्यक्षांच्या ज्या वाक्याला टाळी पडली होती ते वाक्य आपण ऐकलं नाही याबद्दल त्यांना वाईट वाटलं. अधिक लक्ष देऊन अध्यक्षांचं पुढचं भाषण ते ऐकू लागले. त्यांच्या स्वत:च्या मनात जे विचार येऊन गेले होते तेच अध्यक्ष बोलून दाखवीत होते. मुकुंद मंत्री या लेखकाच्या कलेचं चीज इतक्या उशिरा झाल्याबद्दल खेद व्यक्त करीत होते. मुकुंदचा मोठेपणा न ओळखल्याबद्दल समाजाला दोष देत होते. एका श्रेष्ठ कलावंताशी मूर्खपणाचं वैर केल्याबद्दल समाजाला गुन्हेगार ठरवीत होते. जुन्या प्रतिगामी मतांना चिकटून राहणारा समाज आणि प्रचलित नीतिकल्पनांना धक्का देणारा कलावंत यांच्यात नेहमीच कसा झगडा चालत आलेला आहे त्याचं वर्णन करीत होते. भाषणाच्या ओघात त्यांच्या तोंडून कठोर जळजळीत शब्द बाहेर पडत होते...

बहात्तर वर्षांच्या काकासाहेब मंत्र्यांची श्रवणशक्ती बरीचशी शाबूत होती; परंतु त्यांची दृष्टी क्षीण झालेली होती. त्यांना दूरचं नीटसं दिसत नसे. उभं राहून बोलणाऱ्या अध्यक्षांची आकृती त्यांना स्पष्ट दिसत नव्हती. दिव्यांच्या झगझगाटानं लकाकणाऱ्या व्यासपीठावरची माणसंही त्यांना एखाद्या अस्पष्ट थव्यासारखी दिसत होती. अध्यक्षांच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द मात्र त्यांना चांगले ऐकू येत होते. आणि ते ऐकता ऐकता त्यांना मनातल्यामनात भीती वाटत होती की, आता दुसऱ्याच क्षणी अध्यक्ष माझ्याकडे वळून माझाही निषेध तर करणार नाहीत? ज्याप्रमाणं समाजानं मुकुंद मंत्रीची उपेक्षा केली त्याप्रमाणं त्याच्या वडिलांनीही केली. त्यांनाही त्याचा मोठेपणा समजला नाही. त्याचं वागणं त्यांनी नीतीबाह्य ठरविलं. त्यांनीही त्याला



बहिष्कृत केलं– असं तर अध्यक्ष सभेला सांगणार नाहीत? समाजाला फटके मारता मारता अध्यक्षांना माझीही आठवण होऊन त्यांच्या टीकेचा चाबूक माझ्याही अंगावर तर ओढला जाणार नाही?...

काकासाहेबांनी बसल्या जागी अंग चोरून घेतल्यासारखं केलं. त्यांच्या मनात आलं, अध्यक्षांनी भाषणाच्या ओघात आपलंही नाव घेतलं आणि आपलीही चूक जाहीर रीतीनं पदरात घातली तर ते चुकीचं म्हणता येणार नाही. आपल्या हातून मोठीच चूक झाली होती खरीच. मुकुंदाशी आपण जन्मभर वैर केलं होतं. आपण जे जे म्हणू ते ते त्यानं बिनतक्रार ऐकावं अशी अपेक्षा आपण ठेवली होती. निराळ्याच रीतीनं वागण्याचा हट्ट त्यानं केला होता. त्याच्यात व आपल्यात वितुष्ट वाढत गेलं होतं, अंतर पडत गेलं होतं. आपण त्याला प्रेम देऊ शकलो नव्हतो, त्याचं प्रेम मिळवू शकलो नव्हतो. त्याला आपण वाह्यात, मूर्ख, उनाड ठरविलं होतं. त्याच्या अंगचे अलौकिक कलागुण समाजाला जसे ओळखता आले नव्हते त्याचप्रमाणं आपल्यालाही कधी समजले नव्हते. कावेरीशी लग्न न करता तो तिच्याबरोबर राहू लागला, तेव्हा त्याच्या दुर्वर्तनाची हद्द झाली. आपल्या इनामदार घराण्याच्या अब्रूला त्यानं काळं फासलं असं आपण समजलो... अरेरे! किती वाईट वागलो आपण! भर सभेत अध्यक्षांनी आपली हजेरी घेतली तर त्यांना कसा दोष देता येईल...? काकासाहेबांच्या मनात आलं. ‘उगीच आलो आपण या समारंभाला. या समारंभाचं निमंत्रण द्यायला दोन दिवसांपूर्वी मंडळी आली तेव्हा त्यांना प्रथम नकार दिला होता तो बदलायला नको होता आपण...’

ती मंडळी त्यांच्याकडे जेव्हा आली तेव्हा ‘ या, बसा’ म्हणून त्यांचं स्वागत करताना काकासाहेब मंत्र्यांना केवढी ओशाळगत वाटली होती. ‘‘काकासाहेब मंत्री इनामदार आपणच ना?’’ असं त्या मंडळींनी विचारलं, तेव्हा त्यांना अगदी शरमल्यासारखं झालं होतं. ‘इनामदार’ असा उल्लेख ती मंडळी उपहासानं तर करीत नाहीत, असा संशय त्यांना क्षणभर आला होता. त्यांना म्हणावसं वाटलं होतं, कशाला उगीच इनामदार म्हणून मला हिणविता? इनामदारीच्या वैभवाच्या कोणत्या खुणा आता उरल्या आहेत? गेलं ते सारं जुनं वैभव! कामेरी गावचे इनामदार हे नुसते शब्दच शिल्लक राहिले आहेत आता. वाडा गेला, शेतीभाती गेली, उत्पन्न बुडालं, नोकर-चाकर गेले. मानमरातब संपला! आता तीन खोल्यांतल्या या बिऱ्हाडात मी

व माझी बालविधवा बहीण 'आत्या' अशी दोन म्हातारी माणसं कशीबशी निर्वाह करीत आहोत. कशाला उगीच विचारता इनामदार तुम्हीच का म्हणून?... परंतु मनातले हे विचार त्यांनी मनातच ठेवले होते. निमंत्रण देण्यासाठी आलेल्या मंडळीचं स्वागत केलं होतं. खोलीच्या दारातून डोकावणाऱ्या आत्याला ते म्हणाले होते, ''चहा दे ना या मंडळींना.'' मंडळी नको नको म्हणाली होती तरी त्यांनी त्यांना आग्रह केला होता. त्यांना म्हणावंसं वाटलं होतं, ऐन वैभवाच्या दिवसांत कामेरी गावी माझ्याकडे येणाऱ्या पाहुण्यांना पक्वान्नाचं जेवण घातल्यावाचून मी कधी राहिलो नाही. आता तुम्हाला फक्त चहाचं कढत पाणी द्यायची पाळी माझ्यावर आली आहे. ते घ्या म्हणून आग्रह करताना कोणतं दु:ख माझ्या अंत:करणात भडभडून येतं ते मी तुम्हांला काय सांगू? घ्या, चहा घ्या. मला बरं वाटेल...

निमंत्रण घेऊन आलेल्या मंडळींनी योजिलेल्या समारंभाची हकीगत सांगितली होती. सतत पन्नास आठवडे जो चित्रपट चालला होता; ज्या चित्रपटाला सरकारनं पहिल्या क्रमांकाचं सुवर्णपदक दिलं होतं, त्याचा लेखक म्हणून मुकुंद मंत्रीचा गौरव करण्यासाठी मोठी सभा त्यांनी बोलाविली होती. याच सभेत मुकुंदाच्या तैलचित्राचं अनावरणही व्हायचं होतं. या समारंभाला मुकुंद मंत्री स्वत: हजार नसावा ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होती. परंतु तो स्वत: नव्हे तर त्याचे वृद्ध पिताजी आणि त्याचा सहा वर्षांचा मुलगा अशोक या दोघांनी उपस्थित राहावं आणि सभेकडून होणाऱ्या सत्काराचा स्वीकार करावा अशी त्या मंडळींची इच्छा होती. कावेरीबाई हजर राहिल्या असत्या तर दुधात साखर पडली असती; परंतु त्या आजारी असल्यामुळं येऊ शकत नव्हत्या. त्याला इलाज नव्हता...'' आपण अशोकला घेऊन यायलाच पाहिजे''...

काकासाहेब त्या मंडळींना म्हणाले होते, ''एकट्या अशोकला घेऊन जा आपण. मला नका आग्रह करू. आपण मोठा समारंभ करणार आहात हे ऐकून मला फार फार आनंद होतो. कोणत्या बापाला होणार नाही आनंद? पण मी आता बहात्तर वर्षांचा झालो आहे. थकलो आहे. धड चार पावलं टाकता येत नाहीत. डोळ्यांना धड दिसत नाही. अशा अवस्थेत कशाला येऊ समारंभाला?'' परंतु या मंडळींनी ऐकलं नव्हतं. त्यांनी काकासाहेबांचा रुकार घेतला होता. गाडी घेऊन आम्ही न्यायला येऊ असं म्हटलं होतं. कावेरीच्या राहत्या घरी जाऊन ती मंडळी आधीच आली होती. अशोकला आजोबांबरोबर धाडण्याचं तिनं कबूल केलं होतं. त्या मंडळींच्या



तोंडून योजिलेल्या समारंभाचं वर्णन ऐकून तिच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा ओघळू लागल्या होत्या. जवळ उभ्या राहिलेल्या अशोकला तिनं ओढून घट्ट हृदयाशी धरलं होतं आणि त्याचे मुके घेतले होते. ते घेताना जणू तिनं अनेक वेळा प्रेमभरानं मुकुंदाचे जे मुके घेतले होते त्याचीच आठवण तिला होत होती, आणि त्या आठवणीच्या सुखानं ती आपला मन:क्षोभ आवरू पाहत होती...

निमंत्रण द्यावयास आलेल्या मंडळींना ती म्हणाली होती, ''तुमच्या समारंभाला हजर राहता येऊ नये हे माझं केवढं दुर्दैव बघा! पण माझं दुर्दैव मी विसरू शकते. मुकुंदाचा गौरव तुम्ही करणार आहात, हे नुसतं ऐकूनच मला आनंदाचं केवढं भरतं येतं ते तुम्हाला काय सांगू? तुमच्या समारंभात मी शरीरानं नव्हे पण मनानं खचित असेन.'' मग अशोकचं तोंड गोंजारीत तिनं त्याला विचारलं होतं, ''ही मंडळी बोलावायला आली आहेत. जाणार ना तू?''

''एकटाच?''

''नाही रे, तुझे आजोबा येतील ना तुझ्याबरोबर!''

''मी कपडे कोणते घालू आई? कोणता सूट घालू? जांभळा की लाल?''

कावेरी हसून म्हणाली होती, ''ती चर्चा करू आपण मागनं.''

कावेरीचा निरोप घेता घेता निमंत्रण द्यावयास आलेल्या मंडळींपैकी एकानं अशोककडे बघत म्हटलं होतं, ''अगदी हुबेहूब बापासारखा आहे, नाही?''

ते शब्द ऐकून कावेरीच्या चेहऱ्यावर केवढा अभिमान आणि समाधान पसरलेलं दिसलं होतं. तिनं काही न बोलता मान हलविली होती आणि हास्य केलं होतं...

अगदी निघताना मंडळींनी कावेरीला सांगितलं होतं, ''आधी गाडी घेऊन इकडं येऊ, नि मग अशोकला घेऊन काकासाहेबांच्याकडे जाऊ.''

काकासाहेबांना निमंत्रण देऊन आणि त्यांचा रुकार घेऊन निघताना मंडळींनी त्यांनाही सांगितलं, ''आधी अशोकला घेऊन येऊ, मग आपल्याला घेऊन समारंभाच्या ठिकाणी जाऊ.'' काकासाहेब म्हणाले होते, ''ठीक आहे.'' परंतु ती मंडळी गेल्यानंतर त्यांच्या मनात आलं होतं, आपण रुकार दिला हे थोडंसं चुकलंच. मुकुंदच्या पश्चात त्याचा सत्कार घेण्याचा आपल्याला काय अधिकार आहे? त्याच्या हयातीत त्याच्या गुणांची पारख मला करता आली नाही. कौतुकाचे चार शब्द मी त्याला कधी ऐकविले नाहीत. त्याच्या प्रत्येक गोष्टीविषयी मी नापसंती दर्शविली.

जन्मभर त्याच्याशी अढी धरून वागलो. ममता केली नाही. त्याला घरात आसरा दिला नाही. मग आता मुकुंदच्या सत्कारासाठी होणाऱ्या समारंभाला कोणत्या तोंडानं हजर राहू मी? समारंभात कुणीतरी म्हणेल, मुकुंद मंत्रीचे हे वडील. माझ्या गळ्यात हार घालतील. तो हार गळ्यात मिरवण्याची माझी लायकी आहे काय? उलट एकंदर समाजाप्रमाणं मीदेखील मुकुंदशी जन्मभर मूर्खपणानं वैर केलं. गुन्हा केला. या गुन्ह्याबद्दल शासन म्हणून कुणी जाहीर रीतीनं माझा निषेध केला तर तेच अधिक योग्य ठरेल.

बसल्या जागी अंग चोरल्यासारखं करून काकासाहेब मंत्री अर्धवट आंधळ्या नजरेनं अध्यक्षांकडे बघत होते. त्यांच्या मनात येत होतं, 'आता कोणत्याही क्षणी अध्यक्षांच्या टीकेचे फटकारे आपल्या अंगावर बसू लागतील.' त्यांच्या तोंडून कोणते शब्द बाहेर पडतात त्याकडे त्यांचं एकाग्र लक्ष लागलं होतं. फटके सोसण्याची त्यांनी आपल्या मनानं तयारी केली होती. त्यांचे हात-पाय कापू लागले होते...

परंतु त्यांची अपेक्षा आणि भीती खोटी ठरली. अध्यक्षांनी उलट गौरवाच्या शब्दांनी त्यांचा उल्लेख केला- ''मुकुंद मंत्रीचे पिताजी काकासाहेब इनामदार या गोड समारंभाच्या वेळेस आपल्यात उपस्थित आहेत. मुकुंदाचा छोटा मुलगा अशोक हाही त्याचा प्रतिनिधी म्हणून हजर आहे, हे आपल्या सर्वांचं भाग्य होय. आपल्या सर्वांच्या वतीनं मी त्यांना पुष्पहार घालतो.'' असं म्हणून अध्यक्ष व्यासपीठावरून उतरून खाली आहे. त्यांनी काकासाहेबांच्या व अशोकच्या गळ्यांत हार घातले. टाळ्यांच्या कडकडाटानं सभास्थान भरून गेलं... भावना अनावर झाल्यामुळं काकासाहेबांनी हुंदके देता देता छोट्या अशोकला घट्ट मिठी मारली. अशोकनं त्यांना हळूच विचारलं, ''आजोबा, तुम्ही का रडता?'' ते त्याला हळूच म्हणाले, ''छे रे! कुठं रडतो आहे?'' डोळ्यांतले अश्रू तसेच ओघळू देऊन त्यांनी हसण्याचा प्रयत्न केला. अशोक म्हणाला, ''तुमचाही हार मला देता?'' ''घे ना.'' असं म्हणून काकासाहेबांनी आपल्या गळ्यातला हार काढून अशोकच्या गळ्यात घातला. सभेतल्या लोकांनी ते सारं ऐकलं आणि पाहिलं. पुन्हा टाळ्यांचा गजर झाला.

मुकुंदच्या तैलचित्रावरचा पडदा अध्यक्षांनी बाजूला सारला तेव्हा पुन्हा टाळ्यांचा कडकडाट झाला. जो चित्रपट पन्नास आठवडे चालला होता त्याचे निर्माते भाषण करण्यास उठले. त्यांच्यामागून चित्रपटाच्या दिग्दर्शकांनी भाषण केलं.



आणखीही कोणी बोलले. सर्वांनी मुकुंदाच्या परोपरीच्या आठवणी सांगितल्या... काकासाहेबांचं लक्ष त्या भाषणांकडं नव्हतं. दूर अंतरावरच्या तैलचित्रातील मुकुंदाच्या आकृतीकडे पाहण्याचा त्यांनी प्रयत्न केला; मग चित्र निरखून पाहण्याचा प्रयत्न त्यांनी सोडूनच दिला. त्यांच्या शेजारच्या खुर्चीवर आपल्याजागी पुन्हा बसण्याऐवजी अशोक अजूनही त्यांच्यापुढे उभाच होता. गळ्यातल्या दोन गुबगुबीत हारांनी त्याची छोटी मूर्ती संपूर्णत: झाकली गेली होती. आनंदानं फुललेला त्याचा हसरा चेहरा मात्र दिसत होता. काकासाहेब त्याच्याकडे बघत राहिले.

बघता बघता त्यांना अशोक नव्हे तर लहानपणीचा मुकुंदच डोळ्यांपुढे स्पष्ट दिसू लागला. त्या छोट्या मुकुंदच्याही गळ्यात हार होते. मात्र त्याच्या अंगावर कपडे नव्हते. कमरेला पिवळी लंगोटी होती. गळ्यात जानवं होतं, तासलेल्या डोक्यावर शेण्डी होती, डोळ्यांत काजळ होतं. त्याच्या व्रतबंधाचा समारंभ नुकताच पार पडला होता. पवित्र गायत्री मंत्र त्यांनी त्याच्या कानात नुकताच सांगितला होता. तो किंचित भांबावल्यासारखा दिसत होता; पण हसत होता. त्याच्याहून पाच वर्षांनी मोठी असलेली त्याची बहीण भानुमती थोड्या अंतरावर मैत्रिणींच्या घोळक्यात उभी राहून त्याची चेष्टा करीत होती. वाड्यातल्या पुढच्या मोठ्या चौकात घातलेला थाटबाज शोभिवंत मंडप कामेरी गावातल्या स्त्री-पुरुषांनी आणि तालुक्याच्या व जिल्ह्याच्या ठिकाणाहून मुद्दाम आलेल्या बड्या अधिकाऱ्यांनी व पाहुण्यांनी फुलून गेला होता... काकासाहेबांच्या आयुष्यातला अत्यंत आनंदाचा तो प्रसंग होता. गळ्यात सुवासिक फुलांचा हार आणि जानवं, डोळ्यांत काजळ, डोकं तासलेलं, अशा बटुवेषात उभ्या राहिलेल्या मुकुंदाकडे बघून त्यांना धन्यता वाटली होती...

भानुमती चार वर्षांची झाली तरी तिच्या पाठीवर मूल होईना. तेव्हा त्यांना व माईसाहेबांना वाटू लागलं होतं, 'आपल्या नशिबात एकच अपत्य आहे की काय कोण जाणं;' परंतु त्यांची भीती खोटी ठरली होती. मूल झालं होतं, इतकेच नव्हे तर मुलगा झाला होता. इनामदारांच्या घरातच नव्हे तर साऱ्या कामेरी गावात आनंदोत्सव झाला होता. १९१५ साल होतं ते. मंडालेस सहा वर्ष तुरुंगवास भोगून परत आलेल्या लोकमान्य टिळकांनी त्यांच्या गैरहजेरीत थंडावलेल्या राजकीय चळवळीत पुन्हा चैतन्य आणलं होतं. दुसऱ्या महायुद्धाचं दुसरं पर्व सुरू होतं. युद्ध किती दिवस रेंगाळेल ते कळत नव्हतं. सैन्यभरती चालू होती. हिंदुस्थानचा पैसा युद्धकार्यासाठी ओढला